आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३० मार्च २०२४ -शनिवार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान केले.  माजी प्रधानमंत्री पी व्ही नरसिंह राव यांच्या वतीने त्यांचे चिरंजीव पीव्ही प्रभाकर राव, चौधरी चरण सिंह यांच्या वतीने यांचे नातू जयंत सिंग, बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्या वतीनं त्यांचे चिरंजीव रामनाथ ठाकूर यांनी पुरस्कार स्वीकारला. कृषी शास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांच्या वतीने त्यांच्या कन्या  नित्या राव यांनी भारतरत्न सन्मान स्वीकारला. माजी उपप्रधानमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपती, उद्या पुरस्कार प्रदान करतील. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि इतर मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. १७ राज्यं आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमधे मिळून लोकसभेच्या १०२ जागांसाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

महाराष्ट्रातल्या नागपूर, भंडारा - गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर आणि रामटेक या मतदारसंघांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपल्यावर सर्व ठिकाणच्या लढतींचं चित्र स्पष्ट होईल. महाराष्ट्रात प्रामुख्याने भाजपा विरुद्ध काँग्रेस अशीच लढत या टप्प्यात होणार आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय मंत्री आणि भाजपचे  नागपूर मतदारसंघातले उमेदवार नितीन गडकरी यांनी आज मध्य नागपुरात रोड शो केला. मोठ्या संख्येनं भाजप कार्यकर्ते त्यात सहभागी

झाले होते. नितीन गडकरी नागपूर मतदारसंघातून तिसऱ्यांदा लोकसभा निवडणूक लढवत आहेत.

**<><><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील यांच्या स्नुषा डॉ अर्चना पाटील चाकूरकर यांनी आज भाजपात प्रवेश केला.मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाकूरकर यांचं पक्षात स्वागत केलं.

**<><><><><><>**

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर परभणीतून महायुतीचे उमेदवार असतील. सोमवारी ते परभणीतून अर्ज भरणार असून यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित असतील, असा दावा जानकर यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केला.
महाविकास आघाडीतल्या शरद पवार वगळता इतर पक्षांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळं महायुतीमध्ये असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><><>**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट निवडणूक आयोगानं ठेवलं आहे. त्यासाठी थेट मतदान केंद्रांच्या पातळीवर जाऊन आढावा घेण्याचे  प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आकाशवाणीला दिली आहे.

**होल्ड - बाइट**

श्रोते हो, ही संपूर्ण मुलाखत आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर दोन भागात, आज आणि उद्या संध्याकाळी सव्वा सात  वाजता वृत्तविशेष या कार्यक्रमात आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणीच्या समाज माध्यम खात्यांवर, Mumbai

AIR News युट्युब चॅनेलवर आणि आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्टवर देखील  हा कार्यक्रम उपलब्ध आहे.

<><><><><>

मतदान जागृतीसाठी यवतमाळ मध्ये नेहरू स्टेडियम इथं हजारो विद्यार्थ्यांनी मानवी साखळीतून भारताचा नकाशा साकारला.  'वोट' असा मजकूर आणि मतदान चिन्ह देखील यावेळी साकारण्यात आलं.

<><><><><>

श्रोते हो, लोकसभा निवडणुकीची धामधूम राज्यात सुरू झाली आहे. काही जागांवर उमेदवार जाहीर झाले आहेत काही ठिकाणी होणार आहेत. राज्यातल्या लोकसभा मतदार संघातली परिस्थिती कशी आहे, कुठून कोण निवडणूक रिंगणात उतरलंय, निवडणूक लढवण्याविषयी उमेदवारांची भूमिका काय, राजकीय विश्लेषकांचं काय मत आहे, स्थानिकांच्या अपेक्षा काय याचं विश्लेषण करणारा कार्यक्रम ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत आहे. सोमवार एक एप्रिलपासून. संध्याकाळी सव्वा सात  ते साडेसात  या वेळात आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही, हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये आज तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. संपूर्ण विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागात उद्याही पावसाची शक्यता आहे.

//<><><><><>//